**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८.**

**मा.ह प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – १०**

**सभावृत्तांत**

दिनांक – ०६/०२/२०२० वेळ – दुपारी – २.३० वा.

---

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ०६/०२/२०२० रोजी दुपारी २.३० वा. ह क्षेत्रीय कार्यालयातील **पं.दीनदयाळ उपाध्याय** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/नगरसदस्या उपस्थित होते.

१) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत - सभापती
२) मा.शाम गणपतराव लांडगे - सदस्य
३) मा.सुजाता सुनिल पालांडे - सदस्या
४) मा. बनसोडे राजू विश्वनाथ - सदस्य
५) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत - सदस्या
६) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे - सदस्य
७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र - सदस्य
८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सदस्या
९) मा.संतोष बबन कांबळे - सदस्य
१०) मा.सोनवणे शारदा हिरेन - सदस्या
११) मा.उर्षा उर्फ माई मनोहर ढोरे - सदस्या
१२) मा. थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर - स्विकृत सदस्य
१३) मा.लांडगे कुणाल दशरथ - नामनिर्देशीत सदस्य
१४) मा.संजय गुलाब कणसे - नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय मा.संदीप खोत - क्षेत्रीय अधिकारी (ह क्षेत्रीय कार्यालय), श्री.कोळप एस.डी. प्रशासन अधिकारी, श्री.सुपे ए.के. लेखाधिकारी, मा.प्रदिप पुजारी –कार्य.अभियंता स्थापत्य, मा.श्री.रामदास तांबे – कार्य.अभियंता – पाणीपुरवठा, श्री.रामेश्वर मोहाडीकर - उपअभियंता जलनि:सारण विभाग, श्री.विजय जाधव –उपअभियंता स्थापत्य उद्यान, श्री.निखील फेंडर – क.अभियंता स्थापत्य उद्यान, , श्री.विजयसिंह भोसले – उपअभियंता स्थापत्य, झो.नि.पू., श्री.मोरे चंद्रकांत – प्र.उपअभियंता (उद्यान स्था, श्री.दिलीप धुमाळ – उपअभियंता विद्युत, श्री.जे.व्ही.पटेल – सहा.उद्यान अधिक्षक, श्री.आर.डी.शिरसाठ – उद्यान सहाय्यक, श्री.एस.बी.लांडगे – उद्यान सहाय्यक, डॉ.यशवंत इंगळे- वैद्यकिय अधिकारी-वाय.सी.एम.रुग्णालय, श्री.दांगडे सुनिल ज्ञानदेव – क.अ.स्थापत्य, श्री.समीर दळवी – क.अभियंता-विद्युत, श्री.के.एस.अंदुरे – क.अभियंता, - जलनि:सारण, श्री.एस.एन.गर्जे – क.अभियंता पाणीपुरवठा, श्री.संदीप जीवन लोहकरे – क.अभि यंता जलनि:सारण, श्रीम.यादव प्रीती- क.अभियंता जलनि:सारण, श्री.कांबळे विजय – बक.अभियंता स्थापत्य, श्री.महेंद्र के.देवरे – क.अभियंता (स्था), श्री.सानप एस.एस.-क.अभियंता, श्री.श्यामसुंदर बनसोडे- क.अभियंता विद्युत, श्री.बांदल प्रमोद – तारतंत्री विद्युत, श्री.डी.एस.सासवडकर – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.अजय जाधव – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.उध्दव ज्ञानेश्वर डवरी – आरोग्य निरीक्षक, श्री.राजाराम राखपसरे श्री.सुधीर व्ही.वायदंडे आरोग्य निरीक्षक, श्रीमती जयश्री साळवे – क्रीडा पर्यवेक्षक

----------

**मा. सभापती** – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत सभेस सुरुवात करणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे फेब्रवारी २०२० च्या दिनांक ०६/०२०२० रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव**, सभाशाखा : मागील सभा कार्यपत्रिका क्र.०८ माहे जानेवारी २०२० दिनांक ०२/०१/२०२० रोजीचा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : माहे जानेवारी २०२० कार्यपत्रिका क्र. ०८ चा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा** : मागील विशेष सभा कार्यपत्रिका क्र.०९ माहे जानेवारी २०२० दिनांक २२/०१/२०२० रोजीचा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : मागील विशेष सभा माहे जानेवारी २०२० कार्यपत्रिका क्र. ०९ चा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा** :सन्मा. सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र.१-** प्र.क्र.३२ मधील चंद्रमणिनगर भागातील मुतारीबाबत. मा.संतोष बबन कांबळे यांचे दिनांक ०६/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्र.२-** प्रभाग क्र.३२ मध्ये "संविधान प्रस्ताविका" उभारणेबाबत. मा.संतोष बबन कांबळे यांचे दिनांक ०६/०२/२०२० चे पत्र.

**विषय क्र.३-** सांगवी परिसर "महेश मंडळ" संस्थेच्या प्रकल्पासाठी जागा मिळणेबाबत मा.शारदा हिरेन सोनवणे यांचेकडील दिनांक २३/०१/२०२० चे पत्र.

**विषय क्र.४-** प्रभाग क्र. ३१ मधील रस्त्यावर सम विषम पध्दतीने पार्कींग करणेबाबत. मा.माधवी राजेंद्र राजापुरे यांचेकडील पत्र.

**विषय क्र.५-** ओपन स्पेस सिध्दीविनायक मंडळाला देणेबाबत .मा.सुजाता सुनिल पालांडे यांचेकडील दिनांक ०६/०२/२०२० रोजीचे पत्र.

**विषय क्र.६ –** शिवाजी पार्क, नवी सांगवी येथील मनपा गल्ली क्र. १ ते गल्ली क्र.४ या भागाच्या नामफलकावरील नावामध्ये दुरुस्ती करणे बाबत.मा.सौ.उषा उर्फ माई मनोहर ढोरे, महापौर यांचे पत्र.

**विषय क्र.७ –** कासारवाडी येथील आरक्षण क्र.२२ खेळाचे मैदान येथील नवीन कमानीस कै.संजयकुमार सदाशिव लांडगे (मुर्तीकार) नाव देणेबाबत..मा.रोहित आप्पा सुदाम काटे यांचेकडील पत्र.

**विषय क्र.८ –** प्र.क्र.३० आई उद्यान येथील रोडला स्व.नागेश जमादार मार्ग व शहीद विशाल जाधव चौक असे नामकरण करणेबाबत. मा.रोहित आप्पा सुदाम काटे यांचेकडील पत्र.

---------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव - सभाशाखा** : सन्मा. सदस्य यांनी सुचविलेल्या प्रभाग कामकाजाबाबत चर्चा करणेस मान्यता मिळावी.

तदनंतर माहे फेब्रुवारी २०२० च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .

--------

**मा.महापौर –** विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता मिटींगला आले आहेत का?

**मा.सीमा चौगुले –** माझे वॉर्डमध्ये पाण्याचा खूप प्रॉब्लेम आहे.

**मा.राजू बनसोडे –** शट डाऊन सांगितले होते ते काम केले आहे का?

**मा.रामदास तांबे –कार्य.अभियंता पाणीपुरवठा –** शट डाऊनचे काम लवकरच करण्यात येईल. आपण दुरुस्तीचे काम घेतले होते. दुरस्तीचे काम करीत असल्यामुळे शुक्रवारी पाणी उशिरा आले होते.

**मा.राजू बनसोडे –** आमचेकडे रविवारी पाणी आले नाही. पाण्याचे काय प्रयोजन आहे ते सांगा. पाण्याबाबत काय प्रोसीजर आहे ते सांगा. तुम्ही पाण्याबाबत युध्दपातळीवर ते काम करा. तुम्हाला याबाबत काय करता येईल ते करा. परंतू पाण्याची अडचण दूर करा.

**मा.सभापती –** पाण्याचा प्रश्न बिकट आहे. सर्व वॉर्डमध्ये आमचे नगरसेवकांकडे पाण्याचा खूप प्रश्न आहे. दापोडीमध्ये कोणत्या पध्दतीने पाणी देता? पिंपरी मधील वॉलचा प्रॉब्लेम आहे. तो वॉल बंद होत. तो वॉल कधी काढणार? वॉल काढून टाका. वॉल काढण्याचे काम गंभीरपणे घ्या. पाण्याच्या टाकीमध्ये पाणी नव्हते. त्यामुळे पाणी आले नसल्याने नागरीक आमचे घरी आले होते. त्यानंतर मग उशिरा पाणी आले.

**मा.रामदास तांबे –कार्य.अभियंता पाणीपुरवठा -** स्थानिक ठिकाणी पिंपळेगुरव येथे पुर्णपणे काम केले आहे. त्या ठिकाणी लाईट आहे. पिंपळेगुरव येथे पाण्याची पाईप लाईन आहे व सांगवी मध्ये पाईप लाईन आहे. या दोन्ही पाईप लाईन टेक्नीकलसाठी जोडली आहे. सुतारवस्ती आहे तिथे प्रॉब्लेम आहे. त्या ठिकाणी पाणी साठवण्याचा प्रयत्न करीत आहे. ते सर्व काम मी करुन देतो.

**मा.सभापती** – आम्ही सर्व १६ नगरसेवक आहोत सगळयांना आम्हाला पाण्याच्या पाईप लाईन दाखवा. आमचेकडे खूप कमी दाबाने पाणी येत आहे. वॉल बंद केला होता. मी स्वत: टाकीवर गेलो होतो दोन दिवस पाणी नव्हते. नंतर कमी प्रेशरले पाणी आले होते.

**मा.रामदास तांबे –कार्य.अभियंता पाणीपुरवठा** – आपलेकडील वॉल बंद केला नाही. दापोडीला जेंव्हा पाणी येते तेंव्हा पिंपळेगुरव मधील पाणी बंद असते. दुस-या दिवशी पिंपळे गुरव येथे पाणी असते. त्यानंतर दापोडीला पाणी येते. शट डाऊनमुळे प्रॉब्लेम आला होता. आता याबाबत बजेटमध्ये तरतूद केली आहे.

**मा.राजू बनसोडे** – शिवाजी महाराज जयंती असल्याने आरोग्य विभागाकडून साफसफाई करण्यात यावी. टॉयलेटची साफसफाई करण्यात यावी.

**मा.शारदा सोनवणे -** २४x७ पाण्याची जी स्कीम आहे ते काम चालू आहे का? ते काम कोणत्या पध्दतीने चालू आहे. नागरीकांच्या घरासमोर दहा दिवसापासून ढीग पडले आहे. पाणी सोडण्याचा काही तरी टाईम ठेवावा.

**मा.रामदास तांबे –कार्य.अभियंता पाणीपुरवठा** – ती सर्व कामे करुन देतो. पाणी जे पुरवतो त्या पाण्याबाबतचे अडचणी असली तरी मी स्वत: कामे करुन घेतो.

**मा.चंद्रकांत मोरे उपअभियंता -** येथील बरीचशी कामे पुर्ण केली आहे. पाण्याचे वॉलसंबंधी मी स्वत: माहिती घेतली आहे. याठिकाणी मला एक महिनाच झाला आहे.

**मा.सभापती -** तांबे साहेब सगळयांची मिटींग घेण्यात यावी. २४ x७ पाण्याची जी स्कीम आहे त्याबाबत चर्चा करा. सगळयांना याबाबत माहिती करुन घ्यायची आहे.

**मा.शारदा सोनवणे** – काही वेळा तीनशे/चारशे रुपये घेऊन नळकनेक्शन देतात. तो काम करणारा माणूस बदला. पाणीपुरवठा विभागाची जबाबदारी आहे. ऍक्शन का घेत नाही. चुकीचे काम करतात त्यांना काढून टाका.

**मा.सभापती -** वायाळ या कर्मचा-याला सर्व येरीया सुध्दा माहित नाही. सर्व नगरसेवक काही बोलत नाही. नवीन प्रभाग क्र.३१,३२ याठिकाणी २४x७ पाण्याची जी स्कीम आहे व अमृत योजना आहे यामध्ये कोणी काम केले नाही.

**मा.रामदास तांबे** –कार्य.अभियंता पाणीपुरवठा – वेळोवेळी आपण सगळीकडे जात असतो.

**मा.संतोष कांबळे** - आम्हाला जे.ई.बदलून पाहिजे.

**मा.थोरात** – कॉन्ट्रक्टर सहकार्य करीत नाही. ह प्रभागाचे वतीने कार्यवाही करा.

**मा.सुजाता पालांडे -** २४x७ पाण्याची जी स्कीम आहे त्या संबंधीत काम करणारे जे.ई.सुध्दा आले नाही. पाण्याच्या पाईप लाईन फुटल्या आहेत. ते कुठे काम करतात व किती काम करतात हे काहीही माहित नाही. कॉडिनेशन नसल्यमुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे. आमचे काही नगरसेवक पाणी नाही म्हणून मोर्चा घेऊन गेले आहे. २४x७ पाण्याची जी स्कीम आहे त्याबाबत एकत्रीत कोणाचे बोलणे काही होत नाही. पाण्याची पाईप लाईन तुटल्यामुळे अधिका-यांनी काय करायचे या दृष्टीकोनातून काहीही होत नाही. हा विषय आमचा नाही. मोरे साहेब स्वता: अधिकारी आहेत त्यांचेकडून काम करुन घ्यायचे. परंतू त्यांना आमच्या वॉर्डचा विषय नाहीत नाही. पाण्याचा प्रॉब्लेम सगळया नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये आहे.

**मा.चंद्रकांत मोरे उपअभियंता-** ह प्रभागात येऊन फक्त दोनच महिने झाले आहेत. मी काम करीत आहे.

**मा.सुजाता पालांडे -** जे काय कामकाजाचे स्वरुप आहे ते तुम्ही तुमच्यामध्ये मिटवुन घ्या. जबाबदारी तुमची आहे. विषय तुमचा आहे. प्रत्येक वॉर्डला प्रॉब्लेम आहे. याबाबत जे.ई.ला माहित नाही.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – वायाळची जबाबदारी आहे. प्रशासन विभागाने त्यांना त्यांची जबाबदारी दिली आहे.

**मा. रामदास तांबे** –कार्य.अभियंता पाणीपुरवठा - मी स्वत:, सहशहर अभियंता, नगरसेवक, उपअभियंता, क.अभियंता यांचेसोबत सर्व वॉर्डची मिटींग लावण्यात येईल.

**मा.राजू बनसोडे** – दीड दोन वर्षात तुम्ही कधी मिटींग लावली.

**मा.स्वाती माई काटे -** प्रत्येक वॉर्डमध्ये जे.ई.ची खूप गरज आहे.

**मा.चंद्रकांत मोरे उपअभियंता -** वायाळ यांना मी बाजूला ठेवून कामाचा प्रयत्न करीत आहे. कॉन्ट्रॅक्टरचे जे काम आहे ते करणार आहे. परंतू आता तो काम करीत नाही. सध्या तक्रारी आलेल्या नाहीत.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** प्रत्येक वॉर्डमध्ये जो कोणी ठेकेदार आहे अमृत योजनामध्ये काम करणारे त्यांची स्थानिक नगरसेवक, सहशहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी मिटींग केली तर कुठल्या पाईप लाईन तुटल्या आहेत याबाबत सगळी चर्चा केली तर समजून येईल.

**मा.सभापती -** आता मिटींगमध्ये सर्व वॉर्डमधील नगरसेवकांनी सर्व गोष्टी सांगितल्या आहेत. वॉर्ड क्र. ३२ ची वाईट परिस्थीती आहे.

प्रभाग क्र. ३० ची मिटींग दिनांक १७/०२/२०२० रोजी घ्या.

प्रभाग क्र. २० ची मिटींग दिनांक २२/०२/२०२० रोजी घ्यावी.

प्रभाग क्र. ३१ ची मिटींग दिनांक २३/०२/२०२० रोजी

प्रभाग क्र. ३२ ची मिटींग दिनांक ०७/०२/२०२० रोजी मल्हार हॉटेल सकाळी ११.०० वा.

**मा.राजू बनसोडे -** नुकत्याच झालेल्या तानाजी मालुसरे यांच्या जयंतीनिमीत्त त्यांच्या पुतळयाला साधा हार सुध्दा नाही. पुतळयाची साफसफाई होत नाही.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** पुतळयांची एक महिन्यात साफ सफाई करण्यात येईल.

**मा.सुजाता पालांडे -** उद्यान विभागातील लोक काय काम करतात? लांडगे साहेब झाडे कधी तोडता? Without परमिशन माझे येथील झाडे तोडली आहेत. दहा मिनीटात झाडे कापली आहेत.

**श्री.लांडगे – उद्यान विभाग –** ज्यावेळी झाडे कापली त्यावेही मी येथे नव्हतो. मी बारामतीमध्ये होतो.

**मा.सुजाता पालांडे –** लोकांची झाडे कापताना परमिशन लागते. परस्पर त्यांना बोलावून ही झाडे कापली. हे मला आज मिटींग संपायच्या आत पेपरवर पाहिजे. त्यांनी सांगितले म्हणून झाडे कापली असे लांडगेनी मला उत्तर दिले आहे. हे मला लेखी उत्तर पाहिजे. परमिशन शिवाय आम्ही काहीही काम करु शकत नाही.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** लांडगे तुमचेकडे वरीष्ठ कोण आहेत त्यांचेकडून झाडे कापले बद्दल लिहून आणा.

**मा.शारदा सोनवणे –** झाडे कापण्याचे काम किती लोक करतात? रस्ते आणि लाईटची जबाबदारी कोणाची आहे?

**मा.सीमा चौगुले –** माझे वॉर्डमधील ड्रेनेज लाईन तुटली आहे.पैसे घेऊन कामकरुन दिलेले आहे. आमचे येथील जगताप, पाटील यांचे पैसे घेऊन काम केलेले आहे. पाईप लाईन तुटलेली आहे तर ती कोणाची जबाबदारी आहे.

**मा.सभापती –** ड्रनेजचे लाईनचे काम हे लवकरात लवकर करुन दयावे.

**मा.स्वाती (माई) काटे -** कडी कोयंडा तोडलेला आहे ते क्रीडा विभागाकडील कर्मचा-यांनी पाहावे. नवीन आई उद्यान इतके छान केलेले आहे. स्केटींगचे गार्डन केले आहे तेथे बॅटबॉल खेळतात. तेथे क्रिकेट खेळतात हे सुध्दा बघून घ्यावे.

**मा.राजू बनसोडे –** आई गार्डनमध्ये सामान तसेच पडलेले आहे. या भागात काम करीत नाही.

**मा.सुजाता पालांडे –** प्रत्येक वॉर्डमधील काम झाले पाहिजे.

**श्रीम.साळवी – क्रीडा पर्यवेक्षिका –**कडी कोयंडा तोडण्याचे काम ठेकेदारानी केले आहे.

**मा.शारदा सोनवणे –** सहा, सात इन्स्टूमेंटबाबत ठराव केला आहे. हा ठराव का केला? गार्डनचे टेंडरबाबत आम्हाला विचारणा करणे महत्वाचे आहे.

**मा.सुजाता पालांडे –** माझे वॉर्डमधील बॅडमिंटन हॉल आहे त्या ठिकाणी लग्न,मुंजी, बारसे इ.कार्यक्रम होतात. तीनशे पेक्षा जास्त मंडळ या बॅडमिंटन हॉलमध्ये कार्यक्रम घेतात. तो बॅडमिंटन हॉल कार्पोरेशनचा आहे. तो हॉल आपल्या ताब्यात घ्यावा. बॅडमिंटन हॉल हा कोणाच्या वैयक्तिक मालकीचा नाही. एक माणूस एक हजार रुपये घेत आहे. हे गेल्या दहा वर्षापासून चालू आहे.

**श्रीम.साळवी- क्रीडा पर्यवेक्षिका -** बॅडमिंटन हॉल सकाळी ६.०० ते ७.०० वा चालविण्यात येतो

**मा.सुजाता पालांडे -** बॅडमिंटन हॉलमध्ये कार्यक्रम कसे होतात. तेथे सिक्युरिटी दिलेला नाही. पंधरा दिवस लाऊडस्पीकर चालू होता. बॅडमिंटन हॉल सांस्कृतिक हॉल करा. तेथे कार्यक्रम घेऊ नका. तेथे कमर्शियल कोच घेऊन शिकवतात. सकाळी ५.०० ते ६.०० वा. काय होते याचे उत्तर दयावे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी-** बॅडमिंटन हॉल ताब्यात घेतलेला आहे. सकाळी ते १०.०० ते ६.०० व ५ ते ७ ऑनलाईन देतो. मा.आयुक्त साहेब यांचेकडे प्रस्ताव दिला आहे. शिफ्टमध्ये सिक्युरिटी मागविला आहे. बॅडमिंटन हॉल कसे चालवितो त्यांनी भेट दिली आहे का. आयुक्तांकडे पाठपुरावा करत आहे.

**मा.सुजाता पालांडे –** माझेवॉर्डमध्ये जागा नाही. मुलांनी कुठे खेळायचे. कमर्शियल कोच आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** साळवी मॅडम याबाबत अहवाल दया.

**मा.स्वाती (माई) काटे –** माझे वॉर्डमध्ये मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. त्यांना पकडण्यासाठी गाडी आणावी.

- कुत्रे आजारी असेल किंवा पिसाळलेले असेल तरच कुत्रे पकडणारी गाडी येत असते.

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले..**

ठराव क. १३ विषय क्र.- १
दिनांक – ०६/०२/२०२० विभाग -
सुचक – मा.शारदा हिरेन सोनवणे अनुमोदक - मा.उषा उर्फ माई ढोरे
**सदंर्भ –** मा.संतोष बबन कांबळे यांचेकडील दिनांक ०६/०२/२०२० चा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ३२ मधील मैला शुध्दीकरण केंद्रालगत जुनी पुरुष मुतारी अस्तित्वात आहे. सदर ठिकाणी जुनी पुरुष मुतारी तोडून स्त्री व पुरुष स्वतंत्र मुतारी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. १४ विषय क्र.- २
दिनांक – ०६/०२/२०२० विभाग -
सुचक – मा.संतोष बबन कांबळे अनुमोदक - मा.शारदा हिरेन सोनवणे
**सदंर्भ –** मा.संतोष बबन कांबळे यांचेकडील दिनांक ०६/०२/२०२० चा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ३२ मध्ये ममतानगर व बुध्दघोष सोसायटी येथील बुध्दविहार परिसरात **"संविधान प्रस्ताविका"** उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. १५ विषय क्र.- ३
दिनांक – ०६/०२/२०२० विभाग -
सुचक – मा. शारदा हिरेन सोनवणे अनुमोदक - मा.उषा उर्फ माई ढोरे
**सदंर्भ –** मा. शारदा हिरेन सोनवणे यांचेकडील दिनांक २३/०१/२०२० चा प्रस्ताव.

"सांगवी परिसर महेश मंडळ" ही सार्वजनिक संस्था असून विशेषत: माहेश्वरी समाजबांधवांनी स्थापन केलेली संस्था मागील १२ वर्षापासून सार्वजनिक क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. या संस्थेच्या माध्यमातून नियमितणे रक्तदान, आरोग्य शिबीर, शैक्षणिक साहित्य वाटप, संगणक कक्ष, विविध स्पर्धा आदी समाजउपयोगी उपक्रमाचे आयोजन केले जाते. ही संस्था माहेश्वरी समाजबांधवाबरोबरच समाजातील सर्व जाती धर्माच्या, वर्गाच्या सामाजिक, शैक्षणिक व नैतिक प्रगतीसाठी कार्यरत आहे. संस्थेचा विस्तार प्रामुख्याने पिंपरी चिंचवड महानगपालि केच्या कार्यक्षेत्रात आहे. आपल्या भागात बरेच नागरीक हे देशाच्या विविध भागातून उपजिविकेसाठी आलेले आहेत व येथेच स्थायिक झाले. एखादया कुटूंबातील व्यक्ती मृत्यू पावल्यास त्यांच्या कुटूंबियास पोहोचण्यासाठी वेळ लागतो. तेंव्हा ते मृत शरीर (शव) सांभाळण्यासाठी बरीच धावपळ व गैरसोय होते. ही गैरसोय टाळण्यासाठी शवपेटी (MORTURY) बॉक्स संस्थेकडून घेण्याचे ठरविले आहे. सदर शवपेटी नागरीकांसाठी नाममात्र शुल्कात उपलब्ध होईल परंतु सदर शवपेटी ठेवण्यासाठी संस्थेकडे जागा नसल्या कारणाने घेता येत नाही. सदर शवपेटीची किंमत अंदाजे रुपये एक लाख पन्नास हजार आहे. आपण महापालिकेच्या माध्यमातून जर जागा उपलब्ध करुन दिल्यास सदर शवपेटी सुरक्षीत व व्यवस्थित राहू शकते. प्रस्तावित कार्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करण्यास ही संस्था तयार आहे. आपल्यासारख्या समाजहितेशी व विकासाभिमुख कार्यक्षम अध्यक्षांनी या विषयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहुन संस्थेला मार्गदर्शन करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी दिशा दाखविल्यास आम्ही आपले ऋणी राहू सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. १६ विषय क्र.- ४
दिनांक – ०६/०२/२०२० विभाग -
सुचक – मा.माधवी राजेंद्र राजापुरे अनुमोदक - मा.सीमा द.चौगुले
**सदंर्भ –** मा. माधवी राजेंद्र राजापुरे यांचेकडील चा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३१ मधील पिंपळे गुरव व नवी सांगवी भागातील विकास आराखडयातील रस्त्यांवर व मुख्य रस्त्यांवर वाहने उभी करण्याकरीता सम विषम पध्दतीची रचना करुन वाहने उभी करणेबाबत मंजूरी मिळावी. रस्त्यावर उभी असणारी वाहने अस्थव्यस्थ व शिस्तबध्द पध्दतीने उभी राहत नसल्याने वारंवार

वाहतुक कोंडी होत असते व याबाबत नागरीकांच्या अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. तरी सम विषम पध्दतीने प्रायोगिक तत्वावर वाहने उभी करुन या ठिकाणी फलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. १७ विषय क्र.- ५

दिनांक – ०६/०२/२०२० विभाग -

सुचक – मा.सौ.शारदा हिरेन सोनवणे अनुमोदक - मा. माधवी राजेंद्र राजापुरे

**सदंर्भ –** मा. सुजाता सुनिल पालांडे यांचेकडील दिनांक ०६/०२/२०२० चा प्रस्ताव.

माझ्या संत तुकारामनगर मध्ये एक छोटा ओपन स्पेस आहे जो सिध्दीविनायक मंडळास दयावा, कारण ते मंडळ तो ओपन स्पेस साफ करणे तसेच सुरक्षित ठेवण्याचे काम करीत आहे. अन्यथा तिथे गैरवापर दारु, गांजा, याशिवाय काहीही वापर होत नाही. तरी तो मंडळाच्या ताब्यात देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. १८ विषय क्र.- ६

दिनांक – ०६/०२/२०२० विभाग -

सुचक – मा. संतोष बबन कांबळे अनुमोदक - मा.शारदा हिरेन सोनवणे

**सदंर्भ –** मा.उषा उर्फ माई ढोरे, महापौर यांचेकडील पत्रक्र. महापौर/कावि/२३७/२०२० दिनांक ०६/०२/२०२० चा प्रस्ताव.

शिवाजी पार्क, नवी सांगवी ६१ येथील सर्व रहिवाशांच्या वतीने अध्यक्ष, शिवरत्न शंभूराजे वेल्फेअर ट्रस्ट यांनी मनपा गल्ली क्र. १ ते गल्ली क्र. ४ या भागातील नामफलकावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा शिवाजी पार्क असा एकेरी उल्लेख आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी पार्क अथवा शिवछत्रपती पार्क अशी नामफलकावर दुरुस्ती करणेबाबत संदर्भिय पत्राद्वारे विनंती केली आहे. तरी सदर गल्ली क्र. १ ते गल्ली क्र. ४ चे नामफलकावर **छत्रपती शिवाजी पार्क अथवा शिवछत्रपती पार्क** अशी नावामध्ये दुरस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. १९ विषय क्र.- ७

दिनांक – ०६/०२/२०२० विभाग -

सुचक – मा.रोहित आप्पा सुदाम काटे अनुमोदक- मा.राजाभाऊ बनसोडे

**सदंर्भ –** मा.रोहित आप्पा सुदाम काटे यांचेकडील दिनांक ०६/०२/२०२० चा प्रस्ताव.

प्रभाग क्र.३० कासारवाडी, आरक्षण क्र. २२ सर्व्हे नं. ४९७/२अ येथे मनपाने नव्याने खेळाचे मैदान विकसीत केले आहे. तेथील एका नवीन कमानीस कासारवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते **कै. संजयकुमार सदाशिव लांडगे (मुर्तीकार)** असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. २० विषय क्र.- ८

दिनांक – ०६/०२/२०२० विभाग -

सुचक – मा.रोहित आप्पा सुदाम काटे अनुमोदक - मा.राजाभाऊ बनसोडे

**सदंर्भ –** मा.रोहित आप्पा सुदाम काटे यांचेकडील दिनांक ०६/०२/२०२० चा प्रस्ताव.

दिनांक ०१/१२/२०१९ रोजी प्र.क्र. ३० दापोडी येथे जी दुर्दैवी घटना घडली. त्या घटनेत स्व.नागेश जमादार व स्व.शहीद विशाल जाधव यांचा दुर्दैवी अंत झाला त्या मार्गास **स्व.नागेश जमादार व स्व.शहीद विशाल जाधव चौक** असे नाव सदर मार्गास व चौकास देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**मा.सभापती** – मा.सर्व नगरसेवक, अधिकारी/कर्मचारी सर्वच मिटींगला उपस्थित राहिले त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो व मिटींग संपली असे जाहिर करतो.

सही/-
अंबरनाथ चंद्रकांत कांबळे
सभापती ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी- ३४.

जा.क्र.हक्षेका/कावि/ १६७/२०२०
दिनांक – १८/०२/२०२०

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
" ह" क्षेत्रीय कार्यालय
पिपरी चिंचवड महानगरपालिका